प्रत मिळाली
17/07/2025

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. 22 वर्ष Year 2025 दिनांक Date 17/07/25

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. 1988 कलमे Sections कलम 7
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from ........ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to ........ वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 10/07/2025 वेळ Time सकाळी 10:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01/25 तारीख Date 17/07/25 वेळ Time 04:15

4. माहितीचा प्रकार Type of Information तक्रार सत्यापन लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ Chouki / Beat / O.P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name शॉप नं 32, MMRDA मार्केट, BMC पार्किंग, वसंत प्राईड बिल्डिंगच्या ठाकुर ठिकाणाचे नंबर No. if any कॉम्प्लेक्स गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road बाजुला.

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place कांदिवली गाव Village पूर्व पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name संग्राम नखुरे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अंकुश नखुरे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 46 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9819846357

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address श्री गणेश सिद्धि वॉर्ड/सर्व्हे नं. Ward सोसा. घर/नाव नं. House Name No. डि. विंग फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road संत कबीर रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place कोळी पाडा गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka दहीसर (पूर्व) जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

दयानंद धनाजी चव्हाण वय 57 वर्षे, पद - सहकार विभाग पॅनलवरील प्राधिकृत अधि. तथा प्रमाणित लेखा परिक्षक, पत्ता : फ्लॅट नं 502, लक्ष्मी अपार्ट रेसीडेन्सी को.हो. सोसा, IBPS कंपनीजवळ, 90 फिट रोड ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई 400102.

(G.C.P.) K 1043 (A) (1000-1-2025)

फिर्यादी नामे श्री संव्रत अंकुश नखुरे वय ४६ वर्षे, धंदा-नोकरी रा.ठी. ४/२, सहकार कामगार सोसायटी चाळ, फ्रेंडशिप नगर हनुमान टेकडी रोड, कान्नुपाडा, बोरीवली (पूर्व) मुंबई. यांचा जबाब स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आला असून तोच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सही)

(निलेश पाटील)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि मुंबई

(सही)
17/07/2025

(श्री. संव्रत अंकुश नखुरे)

INSPECTOR OF POLICE
ANTI CORRUPTION BUREAU

फिर्याद                    दिनांक – १७/०७/२०२५.

मी संब्रत अंकुश नखुरे, वय ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी, राही : ८/२, सहकार कामगार सोसायटी चाळ, फ्रेंडशिप नगर, हनुमान टेकडी रोड, काजूपाडा, बोरीवली (पुर्व), मुंबई ४०००६६. मो.क्र.९८१९८४६३५७, आधार कार्ड क्र. २५६३ ८०२० २६७६.

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या जन्मापासून राहावयास आहे. माझे सोबत माझी पत्नी सौ. सोनाली संब्रत नखुरे व मुलगी कु. हर्षाली वय २२ वर्ष, मुलगा कु. सार्थक वय १६ वर्ष असे राहण्यास आहे. मला व माझे पत्नीला नवीन फ्लॅट खरेदी करावयाचा होता त्यमुळे माझा इस्टेट एंजट मित्र नामे श्री. विनोद बोबडे याला एक चांगला वन बीएचके फ्लॅट दहीसर पूर्व भागात असल्यास दाखविण्यास सांगितले होते.

त्याअनुषंगाने माझा मित्र श्री. विनोद याने मला दहिसर पूर्व येथील श्री. गणेश सिध्दी 'डी' विंग को.ऑप हौ. सोसायटी, लि., मधील डी–४०३, हा फ्लॅट आम्हाला दाखविला. सदरचा फ्लॅट मला व माझे पत्नीस आवडल्याने माझा इस्टेट एजंट मित्र श्री. विनोद बोबडे यांचे मार्फतीने नमुद फ्लॅटचे मालक श्री. नंदकिशोर शांताराम सरफरे यांची भेट घेवुन नमुद फ्लॅटच्या किंमतीत तडजोड करून ४२ लाखामध्ये सदर फ्लॅट खरेदी करण्याचे निश्चित झाले. त्यावेळी मी माझे आयसीआयसीआय बँकेतील बचत खात्यातुन घरमालक श्री. नंदकिशोर सरफरे यांचे बँकेत टोकन म्हणुन एक लाख ट्रान्सफर केले व शिल्लक रक्कम रू.४१ लाख हे आयसीआयसीआय बँकेकडुन गृहकर्ज घेवुन देण्याचे ठरले.

संबंधित फ्लॅट (डी–४०३) च्या खरेदी व्यवहाराच्या दरम्यान मला माहिती मिळाली की, सदर फ्लॅट असलेली श्री गणेश सिध्दी 'डी' विंग को. ऑप. हौ. सोसायटी लि. ची मॅनेजमेंट कमिटी बरखास्त झाली असुन सोसायटीवर सहकार विभागाचे पॅनलवरील प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक, सहकार विभाग, आर नॉर्थ मुंबई तर्फे म्हणुन श्री. दयानंद धनाजी चव्हाण यांची नियुक्ती झाली असल्याबाबत माहीती मिळाली. त्याप्रमाणे नमुद फ्लॅटचे मालक श्री. नंदकिशोर सरफरे यांनी फ्लॅट विक्रीकरीता प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांच्याकडुन फ्लॅट विक्रीची NOC ही घेतली. सदर फ्लॅट मी खरेदी केल्याचे दिनांक २०/०६/२०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, बोरिवली पूर्व, मुंबई येथे मुंद्राक व नोंदणी शुल्क भरून रजिस्ट्रेशन करण्यात आले. सदरवेळी घर मालक श्री. सरफरे यांनी प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांच्याकडुन मिळालेली फ्लॅट विक्री संदर्भातील NOC मुळ रजिस्ट्रेशन कागदपत्रात जमा केली होती. त्यानंतर रजिस्ट्रेशनची मुळ कागदपत्रे मी माझ्या आयसीआयसीआय बॅकेत गृहकर्ज मंजुर होणेकरीता जमा केली, त्यावेळी कागदपत्रामध्ये बॅंकेस आवश्यक असणाऱ्या गृहकर्ज मिळणेकरीता सोसायटीमार्फत लागणारी NOC ची माझ्याकडुन मागणी केली असता, मी दिनांक २५/०६/२०२५ रोजी श्री. गणेश सिध्दी 'डी' विंग को.ऑप. हौ. सोसायटी लि. चे प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांच्या कांदीवली पूर्व येथील कार्यालयात मी व माझा मित्र श्री. विनोद बोबडे सोबत जावून प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांची भेट घेवुन त्यांना डी– ४०३ हया फ्लॅटच्या रजिस्ट्रेशनची कागदपत्रे यांची झेरॉक्स प्रत देवून मला माझ्या गृहकर्जाकरीता लागणारी सोसायटीची NOC ची मागणी केली असता, त्यांनी माझेकडुन सोसायटीच्या नावे माझे व माझे पत्नीच्या नावे मेबरशिप ट्रान्सफर करीता लागणाऱ्या ट्रान्सफर फी म्हणुन आयसीआयसीआय बॅकेचा रू. २५,७००/– इतक्या रक्कमेचा चेक घेतला, त्यानंतरच मला माझ्या गृहकर्जाकरीता लागणारी NOC दिली.

त्यानंतर डी–४०३ फ्लॅटच्या रजिस्ट्रेशनची मुळ कागदपत्रे व त्यासोबत प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयांनद चव्हाण यांच्याकडुन गृहकर्ज मिळणेकरीता मिळालेली NOC ही संपुर्ण कागदपत्रे आयसीआयसीआय बॅकेत जमा केली असता, दिनांक ३०/०६/२०२५ रोजी मला आयसीआयसीआय बॅकेमार्फत फ्लॅट नं. डी–४०३ चे पूर्व मालक श्री. नंदकिशोर सरफरे यांच्या नावे ४१ लाख रक्कम असलेला डी.डी. मिळाला व तो डी.डी. मी सरफरे यांना सुपूर्द केला.

संबंधित फ्लॅट क्र. डी–४०३ च्या खरेदीचा आर्थिक व्यवहार पूर्ण होवुन त्या फ्लॅटचा रितसर ताबा दिनांक ०८/७/२०२५ रोजी मी घेतला. त्यानंतर दिनांक ०९/०७/२०२५ रोजी संबंधित सोसायटीची मेबरशिप माझे व माझ्या पत्नीच्या नावे व्हावी म्हणून मी व माझा मित्र विनोद बोबडे असे प्राधिकृत अधिकारी तथा

प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांच्या कांदीवली पूर्व येथील कार्यालयात सायंकाळी ४ ते ४:३० वा. चे दरम्यान गेलो असता, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण आम्हाला भेटले. त्यावेळी मी त्यांना सोसायटीची मेबंरशिप ट्रान्सफर होणेकरीता लागणारी सर्व संबंधित कागदपत्रे देवुन मेबंरशिप माझे व माझी पत्नीच्या नावे ट्रान्सफर करून देण्याची विनंती केली असता, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांनी मला सांगितले की, ''श्री गणेश सिध्दी 'डी' विंग को.ऑप.हौ. सोसायटी लि. ची कमिटी बरखास्त झाली असल्याने नव्याने सोसायटी कमिटी पुन्हा प्रस्थापित होईल व नंतरच तुमचे सोसायटी मेंबरशिप ट्रान्सफरचे काम होईल व त्यासाठी ५ ते ६ महिने कालावधी लागेल, जर तुम्हाला घाई असेल तर १ ते २ लाख रूपये मला दया, मी माझे साहेबांना बोलून ८ दिवसांत तुमचे काम करून देतो''. त्यानंतर मी व माझा मित्र विनोद बोबडे घरी निघुन आलो.

त्यानंतर दिनांक १०/०७/२०२५ रोजी सकाळी १०:४८ वा.चे सुमारास मी प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयांनद चव्हाण यांना मोबाईल संपर्क करून माझे सोसायटी मेबंरशिप ट्रान्सफर कामासंबंधी केव्हा आपणांस भेटता येईल असे विचारले असता, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. चव्हाण यांनी मला ते बाहेर असल्याचे सांगुन दिनांक ११/०७/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता कॉल करण्यास सांगितले.

नमुद प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांनी माझे व माझी पत्नीचे नावे श्री. गणेश सिध्दी 'डी' विंग को.ऑप हौ. सोसायटी, लि., मधील डी–४०३, हया सोसायटीचे मेंबरशिप ट्रान्सफर करण्याकरीता माझेकडे मागणी केलेली १ ते २ लाख रूपये लाचेची रक्कम मला लोकसेवकास देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १०/०७/२०२५ रोजी मी ला.प्र.वि. कार्यालयात आलो. तेथे पो.नि. निलेश पाटील, पो. नि. कृष्णा मेखले यांना भेटून त्यांना वरिलप्रमाणे हकीकत सांगितली. पो.नि. निलेश पाटील यांनी मला माझे स्वहस्ताक्षरात तक्रार अर्ज देण्यास सांगितले असता, मी माझे स्वहस्ताक्षरात लिहीलेला तक्रारअर्ज दिला. मी त्यावर सही केली. तो अर्ज पो.नि. पाटील यांनी त्यांच्याकडे ठेवून घेतला व माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगितले.

पो.नि. पाटील यांनी मला दिनांक ११/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता लाप्रवि कार्यालयात बोलाविल्याने मी दि. ११/७/२०२५ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. पो.नि. पाटील यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून त्यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर माझे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज दोन्ही पंचांना वाचण्यास दिला. सदरची तक्रार बरोबर असल्याची खात्री झाल्यावर पंचांनी व पो.नि. निलेश पाटील तसेच पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन पो.नि. कृष्णा मेखले यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या.

त्यानंतर पो.नि. पाटील यांनी पंचास सांगितले की, मी दिनांक ११/०७/२०२५ रोजी लोकसेवक यांना भेटणार असून त्यांच्या कामासंदर्भाने चर्चा करणार आहेत. सदर वेळी लोकसेवक लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यात येणार असून सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस. डी. कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात येईल.

त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला पडताळणी कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. निलेश पाटील, पो.नि. कृष्णा मेखले व दोन सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेलो. तेथे पो.नि. पाटील, माझे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, पंच, पो.नि. पाटील, पो.नि. मेखले व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयाच्या बाहेर येवून दोन सरकारी वाहनाने सी लिंक वरून पश्चिम द्रुतगती मार्गाने कांदीवली पुर्व येथील टी.व्ही.एम. एज्युकेशन स्कुल या ठिकाणी थांबलो. तेथे गेल्यानंतर लोकसेवक प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक श्री. दयानंद चव्हाण यांनी मला येण्याआधी कॉल करण्यास सांगितल्यावरून पो.नि.पाटील व पोनि मेखले यांचे



Jamache

सुचनेप्रमाणे साधारण १३:०२ वा.चे दरम्यान मी माझे मोबाईल क्र.९८१९८४६३५७ वरून लोकसेवक दयानंद चव्हाण यांचे मोबाईल क्र. ९८६७२०३९३८ वर कॉल लावुन स्पीकर ऑन केला असता, मी ' चव्हाण साहेब नमस्कार, नखुरे बोलतोय.. गणेश सिध्दी ओळखलंत का... साहेब काल बोलणं झालेलं' असे बोलला, त्यावर लोकसेवक दयानंद चव्हाण यांनी ' मी दुपारी फोन करतो... मी आहे इकडे बोलून फोन करतो तुम्हाला' असे सांगितले.

काहीवेळ वाट पाहील्यानंतर पो.नि. मेखले यांचे सुचनेप्रमाणे पो.नि. पाटील यांनी मला पंच श्रीमती देवयानी पवार यांचेसोबत लोकसेवक दयांनद चव्हाण यांना प्रत्यक्ष भेटण्यास त्यांच्या कार्यालयात पाठविणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बाजूस असलेल्या बनियनला लावला. त्यानंतर मी व माझे सोबत पंच श्रीमती देवयानी पवार असे रिक्षाने लोकसेवक श्री. दयानंद चव्हाण यांच्या शॉप नं. ३२, गोकुळ गार्डन बिल्डींगच्यासमोर, एमएमआरडीए मार्केट, बीएमसी पार्कींग, वसंत प्राईड बिल्डींगच्या बाजुला, कांदीवली पुर्व, मुंबई येथील मेसर्स डी.डी. चव्हाण असोशिएटस् या ऑफिस मध्ये गेलो असता, नमुद कार्यालयातील चव्हाण सर इन्स्पेक्शन करीता बाहेर गेले असल्याचे समजले. त्यानंतर मी व पंच श्रीमती पवार थोडावेळ लोकसेवक कार्यालयात येण्याची वाट बघून मी व पंच श्रीमती पवार शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी रिक्षाने परत आलो, तेथे माझेकडील व्हाईस रेकॉर्डर पो.नि. पाटील यांनी काढला व बंद केला व पो.नि. पाटील यांनी विचारल्यावर घडलेली हकीगत त्यांना सांगितली. त्यानंतर त्यादिवशी लोकसेवक श्री. चव्हाण त्यांचे कार्यालयात उपस्थित नसल्याने, लोकसेवक श्री. चव्हाण यांची प्रत्यक्ष भेट झाली नाही. त्यामुळे सदरची कारवाई तातपुरती स्थगित करून आम्ही अॅन्टी करप्शन ऑफिस, वरळी येथे सायंकाळी १७:१५ वा.चे दरम्यान परत आलो. तेथे संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट तयार करण्यात आली व सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिनांक १४/०७/२०२५ रोजी मी पुन्हा लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला पडताळणी कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची पुन्हा एकदा माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. निलेश पाटील, पो.नि. मेखले व दोन सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेलो. तेथे पो.नि. पाटील, माझे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

लोकसेवक श्री. दयानंद चव्हाण यांनी मला येण्याआधी कॉल करण्यास सांगितल्यावरून पो.नि. पाटील व पोनि मेखले यांचे सुचनेप्रमाणे ११:३४ वा.चे दरम्यान माझे मोबाईल क्र.९८१९८४६३५७ वरून लोकसेवक दयानंद चव्हाण यांचे मोबाईल क्र. ९८६७२०३९३८ वर व्हॉट्सअॅप कॉल लावुन स्पीकर ऑन केला असता, लोकसेवक चव्हाण यांनी मला दुपारी ०४:०० वाजता त्यांचे ऑफिसमध्ये बोलाविले.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पो.नि. पाटील, पो.नि. मेखले व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयाच्या बाहेर येवून दोन सरकारी वाहनाने सी लिंक वरून पश्चिम द्रुतगती मार्गाने कांदीवली पुर्व येथील बृहन्मुंबई मनपा, समाज कल्याण केंद्र, व्हिलेज पोईसर रोड, मुंबई येथे थांबलो. तेथे गेल्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला पुन्हा खबरदारीच्या सुचना दिल्या. व पंच श्रीमती पवार हया माझेसोबत लोकसेवकाच्या ऑफीसमध्ये व लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेतील. तत्पुर्वी पो.नि. पाटील यांनी मला लोकसेवक चव्हाण यांना कॉल करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईल क्र.९८१९८४६३५७ वरून लोकसेवक दयानंद चव्हाण यांचे मोबाईल क्र. ९८६७२०३९३८ वर साधारण १६:२१ वा.चे दरम्यान कॉल लावुन स्पीकर ऑन केला असता, सदरवेळी मी लोकसेवक चव्हाण यांना " चव्हाण सर तुम्ही काल मला ऑफिसमध्ये बोलावले होते, काय करू मी? येवू का ऑफिसला" असे विचारले असता, लोकसेवक चव्हाण यांनी 'या ' असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला सोबत पंच श्रीमती पवार हया येणार असल्याचे सांगुन पो.नि. पाटील यांनी साधारण १६:३२ वा.चे दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील असलेल्या बनियनला लावला. त्यानंतर मी व माझे सोबत पंच श्रीमती पवार असे रिक्षाने लोकसेवकाच्या शॉप नं. ३२, गोकुळ गार्डन बिल्डींगच्यासमोर, एमएमआरडीए माक्रेट, बीएमसी पार्कींग, वसंत प्राईड बिल्डींगच्या बाजुला, कांदीवली पुर्व, मुंबई येथील मेसर्स डी.डी. चव्हाण असोशिएटस् या ऑफिस मध्ये गेलो. तेथे माझी लोकसेवक चव्हाण यांची प्रत्यक्ष भेट झाली, त्यावेळी त्यांनी मला पंच श्रीमती पवार यांना उद्देशुन विचारले की, तुमच्या सोबत कोण आहे. त्यावर मी लोकसेवक चव्हाण यांना म्हणालो की, माझे सोबत माझी पत्नी आहे. त्यानंतर लोकसेवक चव्हाण यांनी मला सांगितले की, माझे कामासंदर्भात ते त्यांचे साहेबांशी फोनवर बोलणार आहे. आता ते त्यांच्या साहेबांकडेच चालले आहेत व माझे कामाबाबत किती लागणार आहे ते विचारून घेतो, तोपर्यत लोकसेवक चव्हाण यांनी मला व पंच श्रीमती पवार यांना चहापाणी करून सांयकाळी ०६:०० ते ०६:१५ वा. पुन्हा लोकसेवक चव्हाण यांचे कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्रीमती पवार शासकीय वाहन थांबविलेल्या ठिकाणी परत आलो.

काहीवेळ शासकीय वाहनातच थांबुन राहील्यानंतर त्यानंतर पो.नि. पाटील यांनी साधारण १८:१७ वा.चे दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील असलेल्या बनियनला लावला. त्यानंतर मी व माझे सोबत पंच श्रीमती पवार असे रिक्षाने पुन्हा लोकसेवक चव्हाण यांचे ऑफिस मध्ये गेलो. तेथे लोकसेवक चव्हाण यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक चव्हाण यांनी माझेसोबत असलेल्या पंच श्रीमती पवार यांना कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मला लोकसेवकाने मला एकटयालाच कॅबिनमध्ये बोलाविले. त्यानंतर माझी व लोकसेवकाची माझे प्रलंबित कामासंदर्भात चर्चा झाली. त्यादरम्यान लोकसेवक चव्हाण यांनी मला कागदावर १.२५ असा मराठीमध्ये अंकात काढून दाखविले. त्यावेळी मी त्यांना एक लाख पंचवीस हजार का? असे उच्चारले तेव्हा लोकसेवक चव्हाण यांनी मला हाताच्या बोटाने इशारा करून बोलु नका असे खुनावले. त्यानंतर मी लोकसेवक यांना बोटाने इशारा करून एक बोट दाखवुन इशारा केला तेव्हा लोकसेवक चव्हाण यांनी मान हलवुन 'हो' असा इशारा केला. त्यानंतर त्यांच्या टेबलवर असलेल्या कॅल्कुलेटवर १२५००० असा इग्रंजीमध्ये आकडे टाईप करून दाखविला. त्यानंतर मी व पंच श्रीमती पवार असे शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

पो.नि. पाटील यांनी विचारल्यावर घडलेली हकीगत त्यांना सांगत असताना, त्यादरम्यान लोकसेवक चव्हाण यांचा मला साधारण १९:५० वा.चे दरम्यान व्हॉटसअॅप कॉल आला. त्यावेळी पो.नि. पाटील यांनी तात्काळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून सदरचा कॉल ध्वनिमुद्रीत केला. त्यामध्ये लोकसेवक चव्हाण यांनी मला आर्धे डॉक्युमेटन्स घेवुन दिनांक १५/०७/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वा पर्यंत घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शन कार्यालयास परत आलो. तेथे संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट तयार करून सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिनांक १४/०७/२०२५ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक दयानंद चव्हाण यांनी मला दिनांक १५/०७/२०२५ रोजी दुपारी अर्धे डॉक्युमेंट घेवुन येण्यास सांगितले असल्याने मी दिनांक १५/०७/२०२५ रोजी पुन्हा लाप्रवि कार्यालयात हजर झालो. लाप्रवि कार्यालय तेथे पो.नि. पाटील यांनी मला पुन्हा पडताळणी कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. पाटील, पो.नि. मेखले व दोन सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेलो. तेथे माझे, पो.नि. पाटील व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. पो.नि. पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल क्र. ९८१९८४६३५७ वरून लोकसेवक चव्हाण यांचे मोबाईल क्र. ९८६७२०३९३८ व्हाईट अॅप कॉल केला असता, मी लोकसेवक चव्हाण यांना ' नमस्कार चव्हाण साहेब, मला आपल्याशी फोनवर बोलायचे होते, त्यावर लोकसेवक चव्हाण म्हणाले की, 'मी जरा तहसिल कार्यालय बोरिवली येथे आहे. तुम्ही आले आहेत का? ' त्यावर मी लोकसेवक चव्हाण यांना म्हणालो की, ' नाही अजुन ऑफिस मधुन निघत आहे मला तीन ते साडे तीन पर्यंत पोहचतो. त्यावर लोकसेवक चव्हाण मला म्हणाले की, इतक्यात निघु नका मला किती वाजतील माहित नाही. त्यावर मी लोकसेवक चव्हाण

Tanache

यांना बोललो की, ' साडे तीनपर्यंत येतो सर मी' त्यावर लोकसेवक चव्हाण यांनी मला 'या ऑफिस मध्येच या' असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवकासोबत कामासंदर्भात चर्चा करून सायंकाळी ०४:०० वाजे पर्यंत ऑफिसमध्ये येतो असे सांगितले.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पो.नि. मेखले, पो.नि. पाटील व पोशि मिंडे असे लाप्रवि कार्यालयाच्या बाहेर येवून सरकारी वाहनाने कांदीवली पुर्व येथील व्हिडीओकॉन सोसायटीच्यासमोर, बृहन्मुंबई राजश्री शाहु महाराज मुलांचे शासकीय मुलांचे वसतिगृह या ठिकाणी साधारण १७:१५ वा दरम्यान थांबलो. तेथे गेल्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला सांगितले की, दिनांक १४/०७/२०२५ रोजी लोकसेवक चव्हाण यांनी मला सोबत पत्नीस घेवुन येवु नको असे सांगितले होते. त्यामुळे पंच श्रीमती पवार यांना लोकसेवकाचे ऑफिस पासुन काही अंतरावर थांबुन लोकसेवक व मला पाहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील असलेल्या बनियनला लावला. त्यानंतर मी, व पंच श्रीमती पवार यांचेसोबत रिक्षाने लोकसेवकाचे ऑफिसमध्ये गेलो. त्यावेळी मी पंच श्रीमती पवार यांना हाताच्या इशाऱ्याने लोकसेवकाचे कार्यालयापासुन काही अंतरावर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी एकटाच लोकसेवक चव्हाण यांचे ऑफिसमध्ये गेलो. त्यावेळी माझी लोकसेवक चव्हाण यांची प्रत्यक्ष भेट झाली. त्यांच्याशी माझे प्रलंबित कामासंदर्भात चर्चा करीत असताना, लोकसेवक चव्हाण यांनी मला रू. १,१०,०००/— अशी स्पष्टपणे लाचेची मागणी केली व दिनांक १६/०७/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वा. ५०,०००/— इतकी लाचेची आगाऊ रक्कम घेवुन येण्यास सांगितले व उर्वरित रक्कम काम झाल्यानंतर देण्यास सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक चव्हाण यांचे ऑफिसमधुन बाहेर येवुन पंच श्रीमती पवार यांचेसोबत शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

दिनांक १६/०७/२०२५ रोजी मला पो.नि. पाटील यांनी कांदीवली पुर्व येथे व्हिडीओकॉन सोसायटीच्यासमोर, बृहन्मुंबई राजश्री शाहु महाराज मुलांचे शासकीय मुलांचे वसतिगृह या ठिकाणी येण्याच्या सुचना दिल्या असल्याने मी साधारण १४:१५ वाचे दरम्यान सदर ठिकाणी पोहचलो असता, सदर ठिकाणी पो.नि. पाटील, पो.नि. मेखले, दोन पंच व पोलीस पथक असे दोन शासकीय वाहनासह थांबले असल्याचे दिसुन आले. तेथे पो.नि. पाटील यांनी मला पुन्हा एकदा सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर वेळे अभावी शासकीय वाहनातच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि.पाटील व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला तसेच पंच श्रीमती पवार व पंच तुंबडा यांना तसेच सापळा पथकातील सर्व लोकांना सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. पाटील व दोन सरकारी पंचांचे शासकीस वाहनातच वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

पो.नि. पाटील यांनी मला, पोलीस पथक व दोन पंचाना सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर मी माझ्या बचतीतून आणलेली लाचेची रक्कम रु.२०,०००/—(भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या एकुण ४० नोटा) पो.नि. पाटील यांचेकडे सुपुर्द केल्या. पोनि पाटील यांनी पथकातील म. पो.शि. श्रीमती नलावडे यांना मोबाईलमध्ये नोटांचे फोटो काढण्याचे सुचना दिल्या. त्याप्रमाणे म.पो.शि. श्रीमती नलावडे यांनी मोबाईलमध्ये फोटो काढले. व उर्वरीत रक्कम म्हणुन ३०,०००/— ही खेळण्यातील डमी नोटा वापरण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर पो.नि. पाटील यांचे सुचनेप्रमाणे त्यांचे सोबत असलेले वाहन चालक श्री. चिंचोलकर यांनी मला व दोन पंचांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व त्यांचे सुचनेनुसार पथकातील वाहन चालक श्री. चिंचोलकर यांनी लाचेची रक्कम रू. ५०,०००/— यांना अॅन्थ्रासिन पावडर लावली. व ती रक्कम एका सफेद रंगाच्या पाकीटामध्ये टाकुन श्री चिंचोलकर यांनी अलगद माझे सॅगमध्ये ठेवली. तसेच श्री चिंचोलकर हे सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. पाटील यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाचे आतील बाजुस बनीयनला लावला. त्यानंतर पो.नि. पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच श्रीमती पवार असे रिक्षाने लोकसेवक चव्हाण यांचे

ऑफिसकडे निघालो. आमच्या पाठोपाठ पथकातील अधिकारी व अंमलदार कोणासही संशय येणार नाही, अशा पध्दतीने आमचे पासुन काही अंतर ठेवुन गोकुळ गार्डन बिल्डींगच्यासमोर, एमएमआरडीए मार्केट, बीएमसी पार्कींग, वसंत प्राईड बिल्डींगच्या बाजुला, कांदीवली पुर्व, मुंबई येथे रिक्षाने आजुबाजुला येवून थांबले.

त्यावेळी मी शॉप नं. ३२ येथील लोकसेवक चव्हाण यांचे केबीनमध्ये जाते वेळी माझे पाठोपाठ असणारे पंच श्री. तुंबडा व मपोशि नलावडे यांना लोकसेवक चव्हाण यांच्या कॅबिनसमोर मी व लोकसेवक चव्हाण साहेब दिसेल अशा स्थितीत थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक चव्हाण यांचे कॅबिनमध्ये जावुन समोर बसलो. तेव्हा लोकसेवक चव्हाण यांनी मला शेअर सर्टीफिकेट बाबत चर्चा केली. त्यानंतर मी त्यांना पैशाचं कस करू.. त्यावर लोकसेवक चव्हाण यांनी मला इनव्हलप केलयं ना..... काय करू या जावूया तिकडं का देताय माझ्याकडं .... एक काम करा त्या इनव्हलपवर रबर लावा असं करून.... लिअर गुडांळा लिअर वर रबर लावा ......इथंच गुडाळून ठेवा ...बाहेर आपण जावूया गाडीतून साहेबांचा एक मनुष्य आहे ...त्याला असं देवू.... सध्या बाहेर उभा आहे. त्यावर मी लोकसेवक चव्हाण यांना इनव्हलप यांच्यात ठेवुन वरून असे रबर लावू... असे बोलून माझे सोबत आणलेली लाचेची रक्कम रू.५०,०००/– (त्यामध्ये भारतीय चलनाच्या रू. ५००/– दराच्या ४० चलनी नोटा व उर्वरित ५०० दराच्या खेळण्यातील ६० डमी नोटा) असलेले इनव्हलप कागदपत्रामध्ये गुंडाळुन 'हे घ्या' असे बोलल्यावर लोकसेवकाने सदर लाचेची रक्कम त्यांचे रेग्जीनची बॅगेत ठेवण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे मी नमुद लाचेची रक्कम लोकसेवक चव्हाण यांचे बॅगेत ठेवली व 'सर जातो' असे बोलुन ऑफिसच्या बाहेर येत असताना लोकसेवक देखील माझे सोबत बाहेर आले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे डाव्या हाताने तोंडावर रूमाल फिरवुन नियोजीत इशारा केला असता सापळा पथकातील अंमलदार यांनी लोकसेवक चव्हाण यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर लोकसेवक चव्हाण यांना त्यांचे ऑफिसमध्ये आणले व पंचासमक्ष लोकसेवक चव्हाण यांचे बॅगेतुन लाचेची रक्कम हस्तगत केली.

लोकसेवक दयानंद चव्हाण, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक यांनी माझे व माझ्या पत्नीचे नावे सोसायटी ट्रान्सफर करण्याकरीता एक ते दोन लाखाची मागणी केली. लोकसेवक दयानंद चव्हाण यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी लाप्रवि येथे दिलेल्या तक्रारीवरून पडताळणी व सापळा कारवाई करण्यात आल्या. त्यातील दि. १५/०७/२०२५ रोजीच्या पडताळणीमध्ये लोकसेवक दयानंद चव्हाण, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक यांनी माझे व माझ्या पत्नीचे नाव सोसायटी मेबंरशिप ट्रान्सफर करण्याकरीता माझेकडे रु.१,१०,०००/– (अक्षरी एक लाख दहा हजार रूपये) ची मागणी केली. त्यानंतर दिनांक १६/०७/२०२५ रोजी सापळा कारवाईदरम्यान आगाऊ रक्कम म्हणुन रू. ५०,०००/– (अक्षरी पन्नास हजार) लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारून गैरफायदा मिळण्याकरीता कायदेशीर परीश्रमाखेरीज स्वतःच्या आर्थिक लाभासाठी लाचेची मागणी करून ती स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून माझी दयानंद चव्हाण, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझे लोकसेवक दयानंद चव्हाण, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( निलेश पाटील ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी फ्लॅट खरेदी करून रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करून शेअर सर्टिफिकेट फिर्यादी व त्यांचे पत्नीचे नाव चढविण्यासाठी सोसायटीची मॅनेजमेंट कमिटी बरखास्त असल्यामुळे व सोसायटीवर प्रशासकाची नेमणूक असल्याकारणाने फिर्यादी हे प्रशासकांना भेटून शेअर सर्टिफिकेटवर फिर्यादी व त्यांचे पत्नीचे नाव चढवून देण्याबाबत विचारणा केली असता प्रशासकाने काम करून देण्यासाठी 1,10,000/- रु लाचेची मागणी करून तडजोडीअंती आगाऊ 50,000/- रु रक्कम प्रशासकास स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून २५ र.क्र. २२/२५ कलम ०७ भ्र.प्र.अधि 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ...... Rank ...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ......

(3) Transferred to P. S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. [signature] 17/07/2025 प्रत मिळाली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature] 17/07/2025
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... निलेश पाटील
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक) | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer) | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report